## ई - लिलाव (e-Auction) संक्षिप्त जाहिरातीचा नमुना

### खरीप पणन हंगाम २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मधील खरेदी करण्यांत आलेल्या तथापि भरडाई विना शिल्लक धानाची जाहीर ई लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करणे बाबत निविदा सुचना.

विभागाचे कार्यालयाचे नांव :- जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा शाखा , पालघर

ई-निविदा मागविण्याची सुचना :- महाराष्ट्र शासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक खरेदी-२०१५/प्रक्र.१/ना.पु.२९/,मंत्रालय विस्तार, मुंबई ३२, दिनांक १६,मार्च २०१५

कामाचे संक्षिप्त वर्णन :- खरीप पणन हंगाम २०१२-२०१३ व २०१३-२०१४ मधील खरेदी केलेल्या व भरडाई विना शिल्लक असलेल्या पालघर जिल्हयातील धानाची ई-लिलावाव्दारे विक्री करणे.

**जाहीर ई-लिलाव प्रक्रियेव्दारे विक्री करावयाचा धान साठा**

( आकडे क्विंटलमध्ये )

| अ.नं. | गोदामाचे नांव | खरीप पणन हंगाम | शिल्लक धान |
|---|---|---|---|
| १ | साखरे , ता.विक्रमगड , जि.पालघर | २०१२-२०१३ | १२४.९७ |
| २ | कळंभे, ता.वाडा , जि.पालघर | २०१३-२०१४ | ३७१.५० |
| | **एकूण** | | **४९६.४७** |

**ई लिलाव (E-Auction) प्रकियेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यांत आलेले आहे.**

| अ.क्रं | कालावधी | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | दि. २१/०९/२०१६ ते दि. ०५/१०/२०१६ सायं. ५.३० वाजे पर्यंत | ई लिलाव (E-Auction) करणेसाठी संगणकीय नोंदणी (Onli Registration) करणे , राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाची प्रत, पॅन कार्ड, टॅन नंबर सर्टिफिकेट व रहिवासी पुरावा अपलोड करणे. |
| २ | दि. ०६/१०/२०१६ सायं. ६.०० वाजेपर्यंत | **ई लिलाव** (E-Auction) करणेसाठी संगणकीय नोंदणी केलेल्या निविदाधारकांचे अर्जाची छाननी करुन पात्र/अपात्र खरेदीदार ठरविणे. |
| ३ | दि.०७/१०/२०१६ | ई लिलाव प्रक्रिया वरील नमुद केलेल्या वेळेप्रमाणे पूर्ण करण्यांत येईल. |
| | टिप :- प्रत्येक गोदामनिहाय ई-लिलाव समाप्तीचे वेळी बोली न आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी दहा मिनिटे याप्रमाणे २ (दोन) वेळा वेळेत वाढ करण्यांत येईल, याची नोंद घ्यावी. | |

१.निविदेचा तपशिल www.collectorpalghar.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
निविदाकारांनी निविदा कागदपत्रे online अपलोड करून अनामत रक्कम धनाकर्षाद्वारे भरावयाची आहे..

२.निविदाकार एका ठिकाणच्या संपूर्ण साठयाकरीता किंवा एकापेक्षा अधिक ठिकाणच्या संपूर्ण साठ्याकरीता निविदा सादर करु शकतील. परंतु गोदामनिहाय स्वतंत्र निविदा भरणे बंधनकारक राहील. गोदामनिहाय विक्री करावयाच्या धानाची माहिती व इतर तपशिल www.collectorpalghar.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३.निविदाकारांनी त्यांच्या बोली ऑनलाईन/इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सादर कराव्यांत.

४.निविदेत भाग घेण्यांसाठी निविदाकारांनी क्लास III डिजीटल सिग्नेचर आणि वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर निविदा भरण्या करीता नाव नोंदणी करुन घ्यावी.

५. सर्व इच्छुक निविदाकारांनी निविदा सुचनेमध्ये दिलेल्या वेळापत्रकाचे तंतोतंत पालन करावे. ई-निविदा प्रक्रियेत वेळ संपून गेल्यानंतर कोणतीही कार्यवाही करता येत नाही, याची नोंद घ्यावी.

६. कोणत्याही स्पष्टीकरणाकरीता निविदाकारांनी दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२९७०२४ शी संपर्क साधावा.

७. पत्रव्यवहारा करीता संपर्क पत्ता :- जिल्हाधिकारी कार्यालय, पुरवठा शाखा, पालघर
ई मेल पत्ता :- dsopalghar2014@gmail.com

स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे

**जिल्हाधिकारी पालघर करिता**